23-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 22-06-2025 22:54 Page 1



# ‘फातोर्ड्याचा विकास माझ्या कारकिर्दीतच’- दामू नाईक यांचा पुनरुच्चार

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २२ : फातोर्डा मतदारसंघाची २०१२ साली झालेली फेररचना हीच माझ्या पराभवाचे मुख्य कारण ठरली, असा दावा भाजप प्रदेशाध्यक्ष आणि फातोर्डाचे माजी आमदार दामोदर नाईक यांनी केला आहे. त्यांनी स्पष्ट सांगितले की, आपल्या आमदारकीच्या कार्यकाळातच फातोर्डा मतदारसंघात बहुतेक विकासकामे झाली असून, नंतर कोणताही आदर्श’ प्रकल्प या भागात उभा राहिलेला नाही.

रविवारी फातोर्ड्यातील रवींद्र भवन येथे झालेल्या एका कार्यक्रमात नाईक उपस्थित होते. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी जोरदार भाष्य केले.फातोर्डा मतदारसंघात माझ्या काळात जिल्हाधिकारी कार्यालय, दक्षिण गोवा जिल्हा इस्पितळ यांसारखे महत्त्वाचे प्रकल्प आले. आजपर्यंत इतर कोणी असा आदर्श प्रकल्प आणलेला नाही. मी आजही माझ्या त्या आव्हानावर ठाम आहे .कोणी एक तरी आदर्श प्रकल्प दाखवावा, असे नाईक यांनी आव्हानात्मक स्वरात सांगितले.

फातोर्डा मतदारसंघाच्या २०१२ साली झालेल्या फेररचनेचा मुद्दा उपस्थित करताना नाईक म्हणाले, पूर्वी फातोर्डा मतदारसंघात





कोंब’ आणि हाउसिंग बोर्ड’ हे दोन भाग होते, जिथे हिंदू मतदारसंख्या लक्षणीय होती. मात्र फेररचनेनंतर हे भाग अनुक्रमे कुडतरी आणि मडगाव मतदारसंघात टाकण्यात आले. त्यामुळे माझ्या पारंपरिक मतांचा आधार ढासळला आणि माझा पराभव झाला.

फातोर्ड्याचे विद्यमान आमदार विजय सरदेसाई यांचे नाव न घेता नाईक यांनी सूचक टोला लगावत म्हटले की, आज कोणीही त्या प्रकल्पांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करतो आहे. पण सत्य हे आहे की, त्या सगळ्या योजना आणि प्रकल्प माझ्या आमदारकीतच मार्गी लागले.

आज जो फातोर्डा मतदारसंघ दिसतो, तो माझ्या विकासकामांच्या पायावर उभा आहे.

### दामू नाईक यांचे दावे

- फेररचनेनंतर मतदारसंघातून महत्त्वाचे हिंदू बहुल भाग वेगळे केल्यामुळे पराभव झाल्याचा दावा
- जिल्हाधिकारी कार्यालय, इस्पितळासारखे प्रकल्प स्वतःच्या आमदारकीत राबल्याचा पुनरुच्चार
- फातोर्ड्यात आदर्श प्रकल्प दाखवा, मी चर्चेस तयार आहे : पुन्हा एकदा खुले आव्हान
- आजचा फातोर्डा माझ्या विकासकामांवर उभा : अन्य कोणालाही श्रेय न घेण्याचा इशारा

कोणालाही या श्रेयावर डल्ला मारू देणार नाही, असे स्पष्ट करत नाईक यांनी पुन्हा एकदा आपण दिलेल्या विकासाच्या मुद्यावर आपली भूमिका अधोरेखित केली.

# ६.८२ लाखांच्या ‘ड्रग्ज’ सहीत पुण्याच्या तरुणाला अटक

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २२ : राज्यात अंमली पदार्थ विरोधी मोहिमेत आणखी एक मोठे यश मिळवत, अंमली पदार्थ विरोधी कक्षाने (एएनसी ) पुण्याहून आलेल्या एका तरुणाला मेथाम्फेटामाइन’ या अत्यंत धोकादायक अंमली पदार्थासह अटक केली. चोपडे येथे शनिवारी सायंकाळी टाकलेल्या छाप्यात ४५.५ ग्रॅम मेथ’ जप्त करण्यात आले असून त्याची किंमत सुमारे ₹६.८२ लाख इतकी आहे.

एएनसी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यातील दापोडी येथील २८ वर्षीय कृष्णा सोनकेल्लू या संशयितावर तीन दिवसांपासून मानव बुद्धिमत्ता व तांत्रिक साधनांच्या सहाय्याने देखरेख ठेवण्यात येत होती. विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे त्याच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवण्यात आले होते. अधिकाऱ्यांनी सांगितले की सोनकेल्लू शुक्रवारी सकाळी गोव्यात दाखल झाला. त्याने हरमल येथील एक स्थानिक लॉज बुक केले होते. मिळालेल्या माहितीनुसार, तो वीकेंड पार्टीसाठी ड्रग्ज पुरवण्याच्या तयारीत होता.

शनिवारी संध्याकाळी चोपडे



परिसरात तो मेथ’ची विक्री करण्यासाठी येणार असल्याची खात्रीलायक माहिती मिळताच एएनसीच्या पथकाने तत्काळ कारवाई करत सापळा रचला आणि ड्रग्जची खरेदी-विक्री होण्यापूर्वीच त्याला अटक केली.

प्राथमिक तपासात उघड झाले आहे की सोनकेल्लूने मेथाम्फेटामाइन हे अमली पदार्थ मुंबईहून मिळवले होते आणि त्यानंतर पुण्यामार्गे गोव्यात येऊन पुरवठा करण्याचा कट आखला होता. परंतु, एएनसीच्या वेळेवर हस्तक्षेपामुळे त्याचे संपूर्ण बेत हाणून पाडण्यात आले.

ही यशस्वी कारवाई पोलीस निरीक्षक साजिथ पिल्लई यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. त्यांच्या पथकात पोलीस कॉन्स्टेबल गोडिश गोलतेकर, संजय गावकर, साईराज नाईक, विशाल शितोळे आणि महिला पोलीस कॉन्स्टेबल ज्योती नाईक यांचा समावेश होता.

या छाप्याची सखोल देखरेख पोलिस अधीक्षक (एएनसी) सुनीता सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली, उपविभागीय पोलिस अधिकारी नेरलॉन अल्बुकर्क यांनी केली.

अटकेनंतर आरोपीला पेडणे येथील न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली असून, पुढील तपास एएनसी करत आहे.

# दाबोळी विमानतळ परिसरातील उंच बांधकामांबाबत उच्च न्यायालयात सुनावणी

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २२ : अहमदाबाद येथील बीजे मेडिकल कॉलेजच्या वसतिगृह आणि कॅन्टीनमध्ये एअर इंडियाच्या बोईंग विमानाच्या अलिकडेच झालेल्या अपघाताची सुनावणी गोवा येथील मुंबई उच्च न्यायालयात होण्याची शक्यता आहे, जे दाबोळी विमानतळाच्या संवेदनशील फनेल झोनमध्ये अनधिकृत आणि उंच इमारतींच्या बांधकामांबाबत अनेक याचिकांवर सुनावणी करत आहे.

उच्च न्यायालयाच्या चालू प्रकरणांमध्ये निर्देशांच्या मालिकेनंतर, दाबोळी विमानतळाच्या परिसरातील जवळजवळ ५० बांधकामे आधीच पूर्णपणे किंवा अंशतः पाडण्यात आली आहेत, ज्यामुळे विमान वाहतूक क्रियाकलापांना धोका निर्माण झाला आहे.

सुरक्षित विमान ऑपरेशनमध्ये कोणतेही अडथळे येऊ नयेत अशी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाची भूमिका आहे. या परिसरात सुरू असलेल्या उड्डाणपुलाचे कामही थांबवण्यात आले आणि बांधकाम सुरू होण्यापूर्वी उंची कमी करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिल्यानंतर त्याची ऊंची कमी करण्यात आली.

उच्च न्यायालयाच्या कार्यवाहीव्यतिरिक्त, नागरी विमान वाहतूक अधिकारी, मुरगाव नियोजन आणि विकास प्राधिकरण, उपजिल्हाधिकारी आणि इतर एजन्सींसमोर स्पष्ट विमान वाहतूक नियमांचे उल्लंघन करून मंजुरीशिवाय उभारलेल्या अनधिकृत बांधकामांबाबत काही प्रकरणे प्रलंबित आहेत.

अनेक प्रकरणांमध्ये, संरचना केवळ उंचीच्या निर्बंधांचे उल्लंघन करत नाहीत तर स्थानिक प्राधिकरणे किंवा पीडीए यांच्या कोणत्याही परवानगीशिवाय देखील उभारल्या गेल्या आहेत. न्यायालय आणि डीजीसीएच्या निर्देशांनुसार, यापैकी अनेक आधीच पूर्णपणे किंवा अनुपालनासाठी आवश्यक असलेल्या मर्यादेपर्यंत पाडण्यात आल्या आहेत असा डीजीसीएचा दावा आहे.

ऑपरेशनल कंट्रोलमुळे विमानतळाजवळील बांधकामांवर लक्ष ठेवणारी नौदल अंमलबजावणी सुरू ठेवेल, संरचना परवानगीयोग्य उंचीमध्ये राहतील किंवा पाडल्या जातील याची खात्री करेल अशी अपेक्षा आहे. उच्च न्यायालयात पुढील महिन्यात या प्रकरणाची सुनावणी होण्याची अपेक्षा आहे.

# प्रदूषण मंडळाची कारवाई; तरीही मोठ्या आवाजात संगीत सुरूच

■ ऑगस्टो रोड्रिग्स
टीम दैनिक हेराल्ड

हणजूण, दि. २२ : गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने १८ जून २०२५ रोजी हणजूण मधील ’दियाझ’ क्लबचे कामकाज तत्काळ स्थगित केल्याची माहिती पुढे आली आहे. विशेष बाब म्हणजे मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठात या प्रकरणाशी संबंधित अवमान याचिका क्रमांक १२ वर सुनावणी पुन्हा सुरू होण्याच्या केवळ एक दिवस आधी ही कारवाई करण्यात आली. याचिकेवरील कारणे दाखवा’ नोटीसांची सुनावणी २० जून रोजी होणार होती.

मात्र, स्थानिक रहिवाशांनी आरोप केला आहे की मंडळाच्या बंदी आदेशाची पूर्णपणे पायमल्ली करत दियाझ’ क्लबने १८, १९ आणि २० जून रोजी रात्रीच्या वेळी मोठ्या आवाजात संगीत वाजवणे सुरूच ठेवले. यामुळे नागरिकांचे रात्रीचे समाधानाचे आयुष्य विस्कळीत झाले असून, उच्च न्यायालयाला हेतुपुरस्सर चुकीची माहिती देण्याचा प्रयत्न चालू असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

स्थानिक रहिवासी रॉय सेड्रिक म्हणाले की, सरकारी अधिकारी एकीकडे न्यायालयाला सांगतात की योग्य ती कारवाई सुरू आहे, आणि दुसरीकडे प्रत्यक्षात या क्लबमधून पहाटेपर्यंत मोठ्या आवाजात संगीत सुरू असते. यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचा आणि पोलिस व प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रांचा सरळसरळ अवमान होत आहे.त्यांनी त्यांच्या १७ ते १८ जूनदरम्यान ११२ आपत्कालीन क्रमांकावर केलेल्या चार तक्रारींचे स्क्रीनशॉट पुरावे म्हणून दिले.

२० जून रोजी हेराल्ड मिडियाच्या प्रस्तुत प्रतिनिधीने रात्री ११ वाजता दियाझ’ क्लबला भेट दिली असता, तिथून मोठ्या आवाजात संगीत ऐकू येत होते. त्यामुळे ११:५२ वाजता ११२ वर तक्रार नोंदवण्यात आली. मात्र, सकाळपर्यंतही परिस्थिती बदलली नव्हती.

स्थानिक नागरिक, विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्ती, गेल्या काही वर्षांपासून या त्रासाला सामोरे जात आहेत. २०१८ पासून न्यायालयात अवमान याचिका सुरू असून, वारंवारच्या तक्रारींनंतरही परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही.

स्थानिक रहिवासी अॅग्नेस डिसोझा यांनी संतप्त प्रतिक्रिया देताना म्हटले की, उच्च न्यायालयाला खोटे बोलण्याचा हा प्रकार थांबायला हवा. जर आम्ही झोपलो असतो, तर मध्यरात्री ११२ वर तक्रार करत बसलो असतो का ?

१९ जून रोजी प्रदूषण नियंत्रण मंडळाने उच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात ४ ते ९ जून दरम्यान २० युनिट्सच्या तपासणीचा अहवाल देण्यात आला. यामध्ये असे नमूद आहे की डब्ल्यू गोवा ला तपासणीदरम्यान याचिकाकर्त्यांना प्रवेश नाकारण्यात आला होता. हाऊस ऑफ शापोरा तपासणीवेळी बंद होते आणि टीम स्लीक युनिटमध्ये नॉईज मीटरच नव्हता.

दियाझ , मायन बीच क्लब, जिप्सी यासारख्या युनिट्समध्ये नॉईज मीटर बॉक्स आतील भागात लपवण्यात आले होते, आणि निरीक्षणावेळी डिस्प्ले बोर्ड निष्क्रिय आढळले. *नोआ* नावाच्या युनिटमध्ये २२ डेसिबल इतके अत्यल्प वाचन दिसल्याची टिप्पणीही अहवालात नमूद आहे.

याचिकाकर्ते जाविश मोनिस यांनी गुरुवारी न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात नमूद केले की, डब्ल्यू हॉटेल विरोधात दोन एफआयआर दाखल असूनही नियमांचे सर्रास उल्लंघन चालू आहे. त्यांनी एका शासकीय वनअधिकाऱ्याच्या तक्रारीचा उल्लेख करत स्पष्ट केले की २१ फेब्रुवारी रोजीही तेथे मोठ्या आवाजात संगीत वाजवत होते, आणि तरीही अधिकृतरीत्या कारवाई सुरू आहे असे भासवले जात आहे.

वागातोर येथील रहिवासी जेनी क्रॅस्टो म्हणाल्या, पूर्वी आम्ही झोपही घेऊ शकत नव्हतो. आता तरी निदान आशेने डोळे मिटू शकतो. हे सर्व उच्च न्यायालयाच्या कृपेमुळे शक्य झाले आहे. मात्र, अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे.

स्थानिकांचा ठाम विश्वास आहे की, केवळ न्यायालयीन हस्तक्षेपामुळेच त्यांना काहीसा दिलासा मिळतो आहे. मात्र, प्रशासनाची निष्क्रियता, दिशाभूल करणारी प्रतिज्ञापत्रे आणि आस्थापनांची निर्ढावलेली वृत्ती या साऱ्या गोष्टींना आता न्यायालयीनदृष्ट्या गांभीर्याने घेतले जाणे गरजेचे असल्याचे मत या प्रकरणातून स्पष्ट होते.

# आंतरराष्ट्रीय खलाशी दिनानिमित खलाशांचा होणार गौरव

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २२ : गोवन सीमन असोसिएशन ऑफ इंडिया तर्फे येत्या २५ जून रोजी सकाळी १०:३० वाजता रवींद्र भवन, मडगाव येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये आंतरराष्टीय खलाशी दिन उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात गोव्याच्या सागरी परंपरेला उजाळा देत, समुद्रावर सेवा बजावणाऱ्या गोव्यातील खलाशांच्या समर्पणाचा आणि योगदानाचा सन्मान करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचा मुख्य भाग म्हणून, समुद्रात २५ वर्षांहून अधिक सेवा दिलेल्या सक्रिय खलाशांना वचनबद्धता , जिद्द आणि व्यावसायिकतेसाठी गौरविण्यात येणार आहे. या सन्मान सोहळ्यात विविध सागरी अधिकारी, मान्यवर पाहुणे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या उपस्थितीत या खलाशांच्या दीर्घकालीन योगदानाची औपचारिक दखल घेतली जाईल.

कार्यक्रमात माजी मुख्यमंत्री चर्चिल आलेमाव यांनाही विशेष सन्मानाने गौरविण्यात येणार आहे. राजकीय कारकिर्दीपूर्वी त्यांनी खलाशी म्हणून केलेल्या कार्याचा उल्लेख करत, त्यांच्या सागरी



पार्श्वभूमीला आदरांजली वाहण्यात येणार आहे.

या उपक्रमाविषयी बोलताना, गोवन सीमन असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष फ्रँक व्हिएगस म्हणाले की, प्रशासनाच्या कॉरिडॉरपर्यंतचा प्रवास करणाऱ्या गोवन सीफेअर्सना सन्मानित करून आम्ही त्यांचा उत्सव साजरा करत आहोत. हा सन्मान आगामी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.

व्हिएगस पुढे म्हणाले, गोवन सीमन असोसिएशन ऑफ इंडिया हे गोव्यातील खलाशांच्या हक्कासाठी कार्यरत असून, त्यांच्या एकतेसाठी तसेच राष्टीय आणि आंतरराष्टीय पातळीवर त्यांना मान्यता मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. हा कार्यक्रम गोव्याच्या सागरी वारशाचे संवर्धन आणि सन्मान याला चालना देणारा आहे.

# विद्यार्थ्यांना गांजा पुरवणाऱ्या दोघांना अटक; नागरिकांचा संताप

## शाळा-महाविद्यालयांना घेरणाऱ्या स्थानिक ड्रग्ज माफियांच्या मुसक्या आवळण्याचे पोलिसांसमोर आव्हान

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २२ : उत्तर गोवा जिल्ह्यात शैक्षणिक संस्थांच्या परिसरात अंमली पदार्थांचा फैलाव रोखण्यासाठी पोलिसांनी सुरू केलेल्या विशेष मोहिमेत दोन तरुणांना अलीकडेच गांजासह अटक करण्यात आली. हे दोघे विद्यार्थ्यांना गांजा पुरवण्याचा प्रयत्न करत होते, अशी माहिती समोर आली असून, या प्रकारामुळे युवा वर्गात ड्रग्जच्या वाढत्या शिरकावाबाबत नागरिकांमधून चिंता आणि संताप व्यक्त होत आहे.

१६ जून रोजी पेडणे पोलिसांनी पार्से येथून शिवानंद गावडे (वय २८) याला अटक केली. त्याच्या स्कूटरमध्ये लपवून ठेवलेला ७३२ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला, ज्याची अंदाजित किंमत ७० हजार रुपये आहे. दोन दिवसांनी, डिचोली पोलिसांनी मये येथून हर्षदीप घाणेकर (वय १९) याला २९ ग्रॅम गांजासह पकडले, ज्याची किंमत २,९०० रुपये आहे. ही कारवाई शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात अंमली पदार्थांची विक्री रोखण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या



विशेष मोहिमेचा भाग होती.

या प्रकारामुळे सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांनी पोलिसांच्या कारवाईचे स्वागत करतानाच ड्रग्ज नेटवर्कच्या मुळावर घाव घालण्याची गरज अधोरेखित केली आहे.

बायलांचो सादच्या संयोजिका सबिना मार्टिन्स यांनी सांगितले की , ही अतिशय गंभीर बाब आहे .त्या म्हणाल्या, आरोपी विक्री करताना पकडले गेले की फक्त ताब्यात होते, हे स्पष्ट व्हायला हवे. स्वतःच्या वापरासाठी गांजा बाळगणे आणि विक्री यामध्ये कायदेशीरदृष्ट्या मोठा फरक आहे. पोलिस त्यांच्यावर कोणते गुन्हे दाखल करतात ते महत्वाचे आहे .

गोवा सिव्हिक अॅण्ड कंझ्युमर अॅक्शन नेटवर्क (गोवाकॅन ) चे संयोजक रोलँड मार्टिन्स यांनी उत्तर गोवा पोलिसांनी राबवलेल्या मोहिमेचे स्वागत केले. मात्र, त्यांनी यासाठी शाळा व्यवस्थापन आणि पालक-शिक्षक संघटनांच्या सक्रिय सहभागावर भर दिला.ड्रग्जसंबंधी जनजागृती आणि प्रतिबंधासाठी राबवण्यात आलेल्या नॅशनल अॅक्शन प्लॅन फॉर ड्रग डिमांड रिडक्शन’ कार्यशाळेतही नागरी सहभागाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे, असे ते म्हणाले.

मार्टिन्स पुढे म्हणाले की, सध्या तालुकास्तरावर सीओपीटीए कायद्यानुसार कलम ६ (अ) व ६ (ब) अंतर्गत कारवाई सुरू आहे. या कलमांद्वारे शिक्षण संस्थांच्या १०० यार्ड परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्रीस बंदी आहे. याचे पालन होत असल्यास अशा अंमली पदार्थांचा शिरकाव रोखता येईल.

सामाजिक कार्यकर्ते मारियानो फेराव यांनी या प्रकारांमागे सरकार आणि राजकीय वरदहस्त असल्याचा आरोप केला.गोव्यात ड्रग्जची साथ पसरली असून ती आता राज्याच्या अंतर्गत भागातही पोहोचली आहे. पोलिसांकडून गुन्हे नोंदवले गेले तरी गॉडफादर्स’ त्यांना दडपतात. त्यामुळे ड्रग्ज माफिया निर्भय झाले आहेत, असे ते म्हणाले.

फेराव पुढे म्हणाले, याचा सर्वाधिक फटका शाळा-महाविद्यालयातील तरुणांना बसतो. अनेक तरुण ड्रग्जच्या आहारी गेले असून, काही जण नशेसाठी गुन्हेगारीकडे वळले आहेत. गुन्हेगारी वाढत आहे, कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत.त्यांनी राज्य सरकारकडून कठोर कायदे लागू करण्याची आणि ड्रग्ज संस्कृती’वर कडक कारवाई करण्याची मागणी केली.

२६ जून रोजी जगभर साजरा होणाऱ्या अंमली पदार्थांच्या गैरवापर आणि अवैध तस्करी विरोधी आंतरराष्टीय दिना’च्या पार्श्वभूमीवर राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये आणि त्यांच्या परिसरात अशा मोहिमांना अधिक बळ देण्याची गरज असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.

# बंदर विभागावर कारवाईची मच्छीमारांची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव दि. २२ : सिकेरी - नेरुळ नदीकाठच्या पारंपरिक मच्छीमारांवर संकट ओढवले असून, या परिस्थितीसाठी बंदर विभागाच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी असल्याचा आरोप करून, ऑल गोवा स्मॉल स्केल रिस्पॉन्सिबल फिशरीज युनियन ने मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

युनियनने मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे की, बंदर कार्यालयाने पर्यटकांना कॅनो राईडसाठी दिलेल्या परवानग्यांमुळे स्थानिक मच्छीमारांचे मासेमारीचे पारंपरिक काम पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. विशेषतः, पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत १ जूनपासून त्यांची उपजीविका थांबली असून, मच्छीमार कुटुंबांवर उपासमारीची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

ऑल गोवा स्मॉल स्केल रिस्पॉन्सिबल फिशरीज युनियनने याआधी दोन वेळा बंदर विभागाकडे या परवानग्या मागे घेण्याची विनंती केली होती. मात्र, दोन्ही वेळा त्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. पर्यटनासाठी कॅनो चालवण्यास परवानगी देणे म्हणजे पारंपरिक मासेमारी पद्धतींमध्ये थेट हस्तक्षेप आहे. यामुळे नदीतील मास्यांच्या नैसर्गिक हालचालींवर परिणाम होतो आणि पर्यावरणीय संतुलनही बिघडते, असे युनियनने नमूद केले आहे.

संघटनेने जुलै २०२३ च्या सरकारी अधिसूचनेतील परिच्छेद ८ चा उल्लेख करत सांगितले की, गर्दी, सुरक्षिततेचा धोका अथवा स्थानिक मच्छीमारांशी संघर्ष अशा परिस्थितीत बंदर कॅप्टनला परवानग्या नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार आहे. तथापि, या अधिकाराचा उपयोग करण्याऐवजी बंदर विभागाने मच्छीमारांच्या हितालाच दुय्यम स्थान दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मंत्री आलेक्स सिक्वेरा सध्या वैद्यकीय उपचारासाठी दिल्लीतील रुग्णालयात असल्यामुळे बंदर खात्याचे नेतृत्व नसल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली असल्याची चिंता युनियनने व्यक्त केली आहे.जर शासनाने तातडीने लक्ष दिले नाही, तर विभाग आणि पारंपरिक मासेमारांमध्ये असंतोष वाढेल आणि संघर्ष तीव्र होईल, असा इशारा युनियनने दिला आहे.

या संघर्षामुळे तीन आठवड्यांहून अधिक काळ मासेमारी ठप्प झाली आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे सरकारने गांभीर्याने पाहून त्वरित उपाययोजना कराव्यात, अन्यथा परिणाम भयावह होतील, असा स्पष्ट इशारा ऑल गोवा स्मॉल स्केल रिस्पॉन्सिबल फिशरीज युनियनने पत्राद्वारे दिला आहे.